अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# सावरकर नावाच्या सूर्याचे आत्मार्पण

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे संपूर्ण जीवनच एखाद्या धगधगत्या अग्निकुंडाप्रमाणे होते. त्यांनी केलेले प्रत्येक कार्य म्हणजे या अग्निकुंडात टाकलेली समिधाच होती. या यज्ञवेदीमधल्या ज्वाला इतक्या प्रखर आणि तेजस्वी होत्या की, त्यांच्याकडे पाहून कोणीही नतमस्तक व्हावे. सावरकरांच्या कष्टमय आणि समर्पित जीवनाची ती अग्निशिखा आजही प्रेरणा देत आहे. आपले सगळे आयुष्य देशाकरिता समर्पित केलेल्या सावरकरांनी आपल्या स्वत:च्या आयुष्याचा शेवटही आत्मार्पणाने केला. देह तर केव्हाच राष्ट्रार्पण झाला होता. अंदमानमधल्या कठोर शिक्षेने वार्धक्यात त्यांचे शरीर क्षीण झाले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आता हिंदुस्थानचे भवितव्य उज्वल होईल, अशी फार मोठी अपेक्षा त्यांना होती. परंतु जेव्हा स्वकीयांच्याच सरकारने जेव्हा त्यांच्यावर अनेक बंधने घातली तेव्हा शरीराबरोबर त्यांचे मनही क्षीण झाले. आत्मार्पणाच्या आधी म्हणजेच २६ फेब्रुवारी १९६६ च्या आधी काही महिने ते आजाराने बेजारच झाले होते. अशा परिस्थितीत आपल्या हिंदू मायभूमीची दुरवस्था पाहून त्यांना आणखीनच यातना झाल्या. चीनबरोबरच्या युद्धातल्या पराभवाने त्यांना खूपच वाईट वाटले. या पराभवाच्या वृत्ताने अतिशय खंबीर मनाचा हा स्वातंत्र्ययोद्धा अक्षरश: ढसाढसा रडला. अगदी त्यांचे चिरंजीव विश्वासराव यांनीदेखील आपल्या वडिलांना असे रडतांना कधीच पाहिले नव्हते. सशक्त, शक्तीशाली, भारतासाठी आजीवन आवाहन करणाऱ्या सावरकरांना हा पराभव एका अर्थी सहन झाला नाही. त्यांचे हे रडणे स्वत: मधल्या दुर्बलतेसाठी नव्हते. याची देही याची डोळा त्यांना आपल्या मातृभूमीची दैना त्यांना सहन झाली नाही. त्यासाठी अनावर झालेला तो शोक होता. देशासाठी त्यांनी काही करायचे बाकी ठेवले नव्हते.

की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने।
लब्ध प्रकाश–इतिहास–निसर्ग माने।
जे दिव्य दाहक म्हणोनी असावयाचे।
बुद्धयात्री वाण धरिले करी हे सतीचे।

पूर्ण विचार करून देशसेवेचे व्रत घेतल्याने सगळे आयुष्य राष्ट्रासाठी समर्पित करण्याचे व्रत त्यांनी शेवटपर्यंत पाळले. कदाचित म्हणूनच या सतीच्या बाळाचा शेवटही सावरकरांनी आत्मार्पणातून केला असावा, आज त्यांचे स्मरण करीत असतांना देशसेवेच्या सतीच्या बाळाचे महत्त्व आजच्या पिढीला, आजच्या राज्यकर्त्यांना किती वाटते? सद्यस्थिती पाहिल्यावर सावरकरांसारख्या असंख्य हुतात्म्यांच्या हौतात्म्याचे मोल ठेवले गेले नाही, असेच म्हणावे लागेल.

### सावरकरांच्या मनातील खंत

सावरकरांच्या विद्वत्तेबद्दल अनेकांनी गौरवोद्‌गार काढले आहेत. अनेक इतिहासकारांनी त्यांच्या दूरदृष्टीची वाखाणणी केली होती. परंतु आपल्याच स्वकीयांच्या सरकारविषयी म्हणजे स्वातंत्र्य मिळून जेमतेम पाच वर्षे सुद्धा उलटली नव्हती. त्या थोड्या काळातच देशापुढे कोणती संकटे आहेत हे त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले होते. १९५३ मध्ये क्रांतिकारकांच्या स्मारकासाठी निधी गोळा करण्याचे काम झाले. त्यानिमित्ताने त्यांची अनेक ठिकाणी व्याख्याने झाली. कल्याणला झालेल्या एका व्याख्यानात सावरकरांनी आपला देश भरभराट करू शकणार नाही. कारण इथे भ्रष्टाचार आणि लाचखोरीचा बुजबुजाट झाला असल्याचा इशारा त्यांनी दिला होता. त्या व्याख्यानात सावरकर म्हणाले होते की, आज आपल्या प्रशासनामध्ये लाचखोरी आणि भ्रष्टाचार वाढला आहे. नि:स्वार्थी आणि प्रामाणिक माणसांच्या हाती देशाची सत्ता राहिली तरच लोकांना थोडेफार बरे दिवस येतील. नाही तर पुढची पंचवीस वर्षे देशाच्या विकासाची आशाच करायला नको! म्हणजे तेव्हापासून सुरू झालेला भ्रष्टाचार आजही अखंडपणे सुरू आहे. भारतासारख्या देशाने या कालावधीत ज्या वेगाने आपली प्रगती करायला हवी होती ती झाली नाही. कारण सावरकरांनी म्हटल्याप्रमाणे प्रामाणिक आणि नि:स्वार्थी लोकांकडे कधी राज्यकारभार आलाच नाही. ज्या स्पष्ट शब्दांत त्यांनी देशाच्या भवितव्याचे वर्णन केले ते पाहिल्यावर सावरकरांना देशाच्या भल्याशिवाय दुसरा विचारच सुचत नव्हता हे सिद्ध होते. अशा या क्रांतीसूर्यावर आपल्याच स्वत:च्या देशात अधोगतीकडे पाहत पाहत मावळतीला जाण्याची वेळ यावी हे केवढे मोठे दुर्दैव ठरते.

### समर्पणाचे मोल ओळखले गेले नाही

अनेकवेळा असे वाटते की, ज्यांनी या देशासाठी आयुष्य वेचले ती मोठी मंडळी आज हयात असती तर काय झाले असते. कदाचित त्यांच्या धाकामुळे आज भ्रष्टाचाऱ्यांना जागाच उरली नसती आणि काही वेळा वाटते की, आजचे राजकारणी, सत्ताधारी इतके निगरगट्ट आहेत की, त्यांनी या महामानवांचाही अपमान करायला मागेपुढे पाहिले नसते. तो अनुभव सावरकरांना तर आलाच. त्यांना राजकारणातच भाग न घेण्याची अट स्वकीय सरकारनेच घातली. शिवाय त्यांच्या पश्चात अंदमानमधल्या स्वातंत्र्य स्मारकावरचे त्यांनी नाव काढून टाकण्याचा अधमपणाही केला गेला. याचे कारण असे की, शेवटी सूर्याचे तेज ओळखणे आणि त्याच्या प्रकाशाचे महत्त्व जाणणे सगळ्यांनाच जमत नाही. सावरकर हेच असेच क्रांतीसूर्य होते. त्यांचे तेज अजूनही आपल्या समाजाला राजकारण्यांना पुरेसे समजले नाही. अन्यथा त्यांच्याइतका त्याग केलेल्या क्रांतिकारकाच्या वाट्याला असे उपेक्षित जीणे आले नसते. खरे तर सावरकर हे मरणोत्तर 'भारतरत्न' सन्मानाचे आजही मानकरी ठरतात. सर्वार्थाने अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणाऱ्या सावरकरांनी देशभक्तीचे लोकविलक्षण तत्त्वज्ञान मांडले. समाजाला परंपरांच्या जोखडातून मुक्त करण्याचे विचारामृत माजले. एकात्मक आणि एकसंध समाज भारताची खरी शक्ती आहे, हे सांगत असताना विज्ञानाच्या घोडदौडीत, शस्त्रांच्या स्पर्धेत भारताने कधीही मागे राहता कामा नये, असे अतिशय धाडसी प्रतिपादन करणारा राष्ट्रकर्मठ नेता होता. आपण ज्यासाठी हालअपेष्टा सहन केल्या. भारतभूमीच्या भवितव्याची भाग्यरेखा कधीही पुसली जाऊ नये म्हणून सतत नवविचारांचे अवमान आपण केले. परंतु स्वातंत्र्याच्या नंतर केवळ दहा–पंधरा वर्षांत त्यांना खूप विदारक अनुभव आले. त्यांनी त्यांच्या सगळ्या जीवनाचे अर्घ्य तर दिलेच होतेच. परंतु स्वदेशातील दुर्दशा पाहून त्यांना होणारे आत्मक्लेश ते सहन करू शकले नाहीत. या प्रबळ जाणिवेतून आणि शस्त्रभावनेतून त्यांना आपल्या जीवनाची अखेर आत्मार्पणातून केली. त्या क्रांतीकारकास आमचे विनम्र अभिवादन!!